

# आगीला कधी घाबरू नका

# हर्षिणी कान्हेकर

## (फायर इंजिनीयर)

**आपलं काम सुनियोजित** पद्धतीने करणाऱ्या फायर इंजिनीयर हर्षिणी कान्हेकर भारताच्या पहिल्या फायरवूमन आहेत...

मोठमोठे लैडर आणि वौटर पाइप खांद्यावर घेऊन पळणं, फायर ड्रिलिंगचा तासन्‌तास सराव करणं, शहर असो वा गाव वा औइल क्षेत्र प्रत्येक जागी लोकांना अपघातापासून वाचवून प्रत्येक काम सुनियोजित पद्धतीने करणाऱ्या फायर इंजिनीयर हर्षिणी कान्हेकर भारताच्या पहिल्या फायरवूमन आहेत.

नागपूरच्या 'द नैशनल फायर सर्व्हिस' महाविद्यालयातून इंजिनीअरिंगचं प्रशिक्षण घेतलेल्या हर्षिनी या शाळेत असताना एनसीसीमध्ये होत्या, तेव्हा त्यांनी यूनिफौर्म घातलेले कमांडर, फ्लाइंग औफिसर्स यांना पाहिलं होतं. तेव्हाच त्यांनी ठरवलं होतं की, आपल्यालादेखील पुढे यूनिफौर्म घालायचा आहे. पदवीधर झाल्यानंतर त्या आर्म फोर्सेससाठी प्रयत्न करत होत्या. त्याच वेळी त्यांना फायर इंजिनीयरिंगच्या प्रशिक्षणाबद्दल समजलं. अखिल भारतीय पातळीवर प्रवेश परीक्षा पास केल्यानंतर त्यांना शिकण्याची संधी मिळाली. फक्त ३० जागांच्या या महाविद्यालयात हर्षिणी एकमात्र महिला होत्या.

उत्तम शारीरिक प्रकृती असलेल्या हसतमुख हर्षिणींना या क्षेत्रात येण्यास खूप मेहनत करावी लागली. यामुळे लोक त्यांना साहसी म्हणत असत. परंतु त्या सांगतात की, माझे आईवडील खरे साहसी आहेत. त्यांनी तिला कौलेजमध्ये शिकण्याची अनुमती दिली. तसंच त्यांना माहीत होतं की, आपल्या मुलीने एखाद्या गोष्टीचं वेड घेतलं तर ती पूर्ण करणारच.

> ❶ फायर इंजिनीयर हर्षिणी कान्हेकर भारताच्या पहिल्या फायरवूमन आहेत. ❷ नागपूरच्या 'द नैशनल फायर सर्व्हिस' महाविद्यालयातून इंजिनीअरिंगचं प्रशिक्षण घेतलेल्या हर्षिणी या शाळेत असताना एनसीसीमध्ये होत्या. ❸ हर्षिणींना लोक साहसी म्हणत असत. ❹ त्यांनी एखाद्या गोष्टीचं वेड घेतलं तर ती पूर्ण करतातच. ❺ खांद्यावर शिडी आणि पाइप घेऊन राउंड मारावा लागतो आणि स्त्री हे सर्वकाही करू शकते हे त्यांनी दाखवून दिलं.

या क्षेत्रात येण्यासाठी त्यांना यूपीएससीची प्रवेश परीक्षा द्यावी लागली. ही परीक्षा मात्र सायन्सची पदवीधर झाल्यानंतर दिली जाते. ज्यामध्ये भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र विषय अनिवार्य असतात. भारतात केवळ नागपूरमध्येच याचा सर्वात चांगला अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

यासाठी सर्वप्रथम दररोज सकाळी तासभर परेड करून घेतली जाते. त्यानंतर क्लासेस आणि पुन्हा परेड. खांद्यावर शिडी आणि पाइप घेऊन राउंड मारावा लागतो आणि स्त्री हे सर्वकाही करू शकते हे त्यांनी दाखवून दिलं.

एखाद्या ठिकाणी आग लागली तर त्यासाठी सर्वप्रथम कोणते सुरक्षात्मक उपाय योजावेत याबाबत त्यांनी सांगितलं की, जर आग लागली असेल तर सर्वप्रथम मदतीसाठी मोठ्याने आरडाओरडा करा. यामुळे आजूबाजूच्या लोकांना याची सूचना मिळेल आणि ते अग्निशमन दलाला बोलावतील. जर आग इलेक्ट्रिकल सामानाला लागली असेल तर त्वरित 'मेन स्वीच' बंद करा. जर तुम्ही बिल्डिंगमध्ये असाल तर लिफ्टऐवजी पायऱ्यांचा वापर करा आणि एका सुरक्षित जागी जमा होऊन फायर फायटर्सना मदत करा.

घरात वा दुकानात कोणी आगीच्या फेऱ्यात फसले असतील तर सर्वप्रथम आग लागलेल्या जागेवरच्या खिडक्या आणि दरवाजे खोला म्हणजे धूर बाहेर निघून जाईल आणि धुरामुळे श्वास कोंडला जाणार नाही.

यानंतर ओलसर रुमाल नाकापर्यंत बांधा म्हणजे धूर नाकात जाणार नाही. कपड्यांना आग लागली असेल तर पळत न सुटता जमिनीवर झोपून शरीर रोल करा.

नोकरदार महिलांनी घराबाहेर पडताना पूर्ण घर बंद करू नये, काही खिडक्या तरी उघड्या ठेवाव्यात. म्हणजे आग लागल्यानंतर धूर आतमध्ये पसरणार नाही. तसंच गैसचं नौब व इलेक्ट्रिक बटनंदेखील बंद करावीत. घराची एक चावी स्वत: जवळ वा एखाद्या शेजाऱ्यांकडे ठेवावी.

घरातील सुरक्षेबाबत त्यांनी सांगितलं की घरात प्रथम पावर व्हेण्टिलेशन असणं गरजेचं आहे. देवघर वा गैसशेगडीजवळ पडदे टांगलेले नसावेत. घरातील इलेक्ट्रिक सौकेटमध्ये लिकेज आहे की नाही याची माहिती घ्यावी.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सगळीकडे १०१ क्रमांक असतो. याव्यतिरिक्त जवळच्या फायर स्टेशनचा नंबर जस्ट डायलने घेऊ शकता. आग कोणत्या प्रकारची आहे ते समजून घेण्याचा प्रयत्न करा. घरात जिथे इलेक्ट्रिकचं सामान असेल तिथे छोटासा सी ओ टू एक्सटिंग्विशर ठेवा, स्वयंपाकघरात ड्राय केमिकल पावडर' तसंच गाडीत 'हैलोन एक्सटिंग्विशर' आवर्जून ठेवा. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आग लागूच देऊ नका. यासाठी नियमितपणे घरातील सौकेट व गैसगळती याकडे लक्ष ठेवा. – **सोमा घोष** ●



# आगीशी खेळणारी हर्षिनी



**अग्निशमन हे क्षेत्र अनेक वर्षं पुरुषांची मक्तेदारी समजली जायची. नागपूरच्या फायर कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन या क्षेत्रातला अभ्यासक्रम रीतसर पूर्ण करत मुलींसाठी त्याची कवाडं खुली करणारी पहिली महिला म्हणजे हर्षिनी कान्हेकर. अर्थात, एक सामान्य मुलगी ते पहिली फायर वुमन होण्यापर्यंतचा हर्षिनी यांचा प्रवास अतिशय खडतरच होता. स्वत:ला सिद्ध करता करता त्या समस्त आयुष्यात काहीतरी वेगळी कारकीर्द करू पाहणाऱ्या महिलांचं प्रतिनिधित्व करत होत्या. म्हणूनच प्रत्येक वेळी त्या गिनिपिगच ठरत होत्या. अवहेलना, टीकाटिपणी अशा सगळ्याला सामोरं जात असतानाही त्या डगमगल्या नाहीत, त्यांनी धैर्याने, निष्ठेने प्रशिक्षण पूर्ण दाखवून दिलं. सध्या 'ओएनजीसी'मध्ये वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या हर्षिनी यांनी खऱ्या अर्थाने आगीशी मुकाबला केला आहे.**

अश्मयुगात मानवाने अग्नीचा शोध लावला. त्यानंतर स्वयंपाक करण्यासाठी महिला आगीचा वापर करून चूल पेटवत होत्या. म्हणजे ही आग तशी आपल्या जवळचीच! या अग्नीची दोन रूपं. पोटातला अग्नी शमवण्यासाठी तारक ठरणारी तर कधी जीव घेणारी, रौद्र रूप धारण करणारी! खरं तर महिला स्वयंपाक करण्यासाठी अग्नीचा कित्येकदा वापर करतात. ही आग रौद्र रूप धारण करते तेव्हा तिला शांत करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जाते. अशी पराकाष्ठा करणारे अग्निशमन दलाचे जवान आपण कित्येकदा पाहतो. पण या प्रयत्नांमध्ये एखादी महिला सहभागी होते तेव्हा प्रत्येकाच्याच भुवया उंचावल्याशिवाय राहत नाहीत. लोकांच्या भुवया कितीही उंचावल्या तरी बेहत्तर, त्याकडे दुर्लक्ष करून केवळ आपलं ध्येय गाठणारी आणि समस्त महिलांसाठी एका आगळ्यावेगळ्या क्षेत्राचं कवाड खुलं करणारी पहिली भारतीय फायर वुमन म्हणजे हर्षिनी कान्हेकर.

सध्या हर्षिनी ओएनजीसी या ऑइल कंपनीत 'वरिष्ठ अग्निशमन अधिकारी' म्हणून कार्यरत आहेत. देशातल्या पहिल्या फायर वुमन असूनही हर्षिनी डाउन टू अर्थ म्हणजे जमिनीवर पाय असलेल्या आहेत. कुठेही गर्व नाही, सहकाऱ्यांशीही मिळून मिसळून वागणाऱ्या. त्यांचा हा गुण अगदी पहिल्यावहिल्या संभाषणातही जाणवतो. दिवाळी अंकाच्या मुलाखतीसाठी विचारणा करण्यासाठी फोन केला तेव्हाही खूप दिवसांनंतर जणू आपण एखाद्या मैत्रिणीशीच बोलत आहोत की काय, अशाच त्या बोलत होत्या. कोणतेही आढेवेढे न घेता आपल्या कामाच्या धबडग्यातून त्यांनी

**अदिती पराडकर**

मुलाखतीसाठी पटकन वेळही दिली. तेव्हाच त्यांच्याविषयी आणखी जाणून घेण्याची, त्यांना भेटण्याची उत्सुकता वाढतच गेली. मात्र त्याच वेळी दुसरीकडे कुठेतरी मनावर दडपणही आलं होतं. त्या कशा असतील, कशा बोलतील... पण ते दडपण हर्षिनी यांना भेटल्यावर कुठल्या कुठे निघून गेलं. इतकी त्यांची वागणूक मैत्रीपूर्ण आणि सौहार्दपूर्ण होती.

आपण एखादं वेगळं करिअर निवडतो तेव्हा त्याची खूणगाठ आपण आधीच मनाशी पक्की केलेली असते. त्यासाठी आपण खूप स्वप्नं पाहतो, धडपडतो. ही स्वप्नं आपली पॅशन कधी होतात हेच कळत नाही. फायर ऑफिसर होण्याचं स्वप्न हर्षिनी यांनी लहानपणापासूनच उराशी बाळगलं असणार आणि ते पूर्ण करण्यासाठी त्यांनीही प्रयत्नांची पराकाष्ठा केली असणार. असंच काहीसं त्यांच्याबाबतीत झालं असावं, असं वाटलं. म्हणून त्यांना या क्षेत्राकडे आपण यावं, असं का आणि कधी वाटलं, असं विचारलं. या प्रश्नावर त्या म्हणतात, 'फायर ऑफिसरच व्हायचं असं मी लहानपणापासून काहीच ठरवलं नव्हतं. खरं तर या क्षेत्रात मी अपघातानेच आले आणि नंतर हे क्षेत्र माझी पॅशन कधी झालं ते माझं मलाच कळलं नाही.'

नोकरीनिमित्त हर्षिनी यांच्या वडिलांची बदली नाशिकला झाली, तेव्हा त्या इयत्ता तिसरीत होत्या. त्यांनी नाशिकच्या 'सीडीओ मेरी हायस्कूल'मध्ये प्रवेश घेतला. ही शाळा केवळ मुलींचीच होती. शाळेत असल्यापासूनच शाळेच्या विविध स्पर्धांमध्ये किंवा शिक्षणोत्तर उपक्रमांमध्ये उदाहरणार्थ, रांगोळी स्पर्धा, केशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये त्या नेहमीच सहभागी होत असत, पण त्या या क्षेत्रात वळण्यामागे वेगळंच कारण होतं. त्या म्हणतात, 'शालेय जीवन असो वा महाविद्यालयीन, त्या दिवसांत मी चारचौघींप्रमाणेच जीवन जगले. इतकंच काय, माझं कॉलेजही केवळ मुलींचंच होतं. तेव्हाही माझं ध्येय मनाशी पक्कं झालं नव्हतं. पण युनिफॉर्म धारण केलेल्या लष्करी जवानांविषयी कायम कुतूहल किंवा आकर्षणच वाटायचं. त्यांचा तो गणवेश पाहून आपणही असा गणवेश परिधान करावा, असं मनोमन वाटायचं. पण अशा क्षेत्रात जाण्यासाठी बारावीनंतर जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित असे विषय घेणं आवश्यक असतं. त्यामुळे बारावीनंतर 'पीसीएम' घेतलं होतं. पण पुढे काय करायचं हे काहीच ठरलं नव्हतं.'

कॉलेज शिक्षण सुरू असतानाचा हर्षिनी यांना एक संधी अगदी मिळता मिळता हुकली. त्यांच्या एका बास्केटबॉलपटू मित्राने एनसीसीचे भरती फॉर्म निघाल्याचं सांगितलं. पण फॉर्म भरायला त्या गेल्या तेव्हा खूप उशीर झाला होता. कारण एनसीसीची अॅडमिशन होऊन एखादा कॅम्पही झाला होता. तरीही त्या मागे हटल्या नाहीत. त्याच वेळी तिथले रिंग कामांडर सचदेव यांनी हर्षिनी यांना तिथे पाहिलं. एक मुलगी आपला अर्ज घेऊन यासाठी आली असल्याचं त्यांनी पाहिलं आणि त्यांना हर्षिनी यांच्याविषयी कुतूहल वाटलं. त्यांनी हर्षिनी यांना केबिनमध्ये बोलावलं आणि त्यांची मुलाखत घेतली. अॅडमिशनही दिली. मात्र त्यांनी एक अट घातली. ते म्हणाले, 'आमचा हा कोर्स खूप कठीण असतो. कित्येक जण तो मध्येच सोडून जातात. असं जर कोणी सोडून गेलं, तर आम्ही नक्कीच तुझ्या नावाचा विचार करू.' सगळं संपलं होतं. याबाबत हर्षिनी म्हणतात, 'अॅडमिशन फुल झाल्यामुळे मी काही बोलू शकत नव्हते, पण तो युनिफॉर्म आणि त्या युनिफॉर्ममधला कडकपणा पाहिला आणि आपणही असाच युनिफॉर्म घालणारं क्षेत्र निवडावं असं मनाशी







पक्कं केलं आणि बाहेर पडले. या क्षेत्राकडे वळण्यामागे माझ्या आयुष्यातला तोच खरा टर्निंग पॉइंट ठरला, असं म्हटलं तरीही चालेल.'

हातातोंडाशी आलेला घास त्यांच्यापासून खेचून घेतला जात होता, पण तरीही त्या डगमगल्या नाहीत. तो विषय मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी दडून बसला होता. पदवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे काय करायचं, म्हणून त्यांनी 'एमबीए'ला अॅडमिशन घेतली. पण त्यांना मात्र त्यात काडीमात्र रस नव्हता. त्या शिकत होत्या, पण त्यात त्यांचं मन रमत नव्हतं. त्याच वेळी त्यांच्या वडिलांनी वर्तमानपत्रात फायर कॉलेजची जाहिरात पाहिली. हर्षिनी घरी आल्यावर त्यांनी ताबडतोब त्यांना ही जाहिरात दाखवली. त्या म्हणतात, 'माझ्या वडिलांनी मला नेहमीच शिक्षणासाठी प्रोत्साहन दिलं. कधीच कोणत्याही बाबतीत नाहीचा पाढा वाचला नाही. त्यामुळेच एनसीसी असो, एमबीए असो वा फायर कॉलेजची अॅडमिशन... मला कोणी हे करू नको, ते करू नको, असं कधीच म्हटलं नाही.'

'नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज' हे भारतातलं नागपूर येथील एकमेव आणि जगातलं दुसऱ्या क्रमांकाचं कॉलेज आहे. त्यामुळे त्या कॉलेजमध्ये अॅडमिशन घेण्यासाठी यूपीएससीप्रमाणेच प्रवेश परीक्षा द्यावी लागते. तसंच ते पूर्णतः मुलांचं कॉलेज आहे. अशा कॉलेजमध्ये एक मुलगी अॅडमिशनसाठी आली आहे म्हटल्यावर लोकांच्या काय प्रतिक्रिया उमटतील हे काही नव्याने सांगायलाच नको. सगळ्यांच्याच तो चर्चेचा आणि काहीसा थट्टेचा विषय झाला होता. हर्षिनी त्या कॉलेजमध्ये अॅडमिशन घ्यायला गेल्या तेव्हा त्यांनाही तसाच काहीसा अनुभव आला. त्या म्हणतात, 'ही खरं तर २००१ सालची घटना. तेव्हा खरं तर पुरुषांची मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या इतर अनेक क्षेत्रांत मुलींनी पदार्पण केलं होतं. किरण बेदी यांचं उदाहरण डोळ्यांसमोर होतं. पण १९५६पासून फायर कॉलेजमध्ये कधीच कोणत्याही मुलीने प्रवेश केला नव्हता. मी अॅडमिशन घ्यायला गेले, तेव्हा तिथली माणसं जरा संशयानेच पाहात होती. ही मुलगी कोण आली, जीपीओ समजून चुकून आली आहे का? पोस्ट ऑफिस बाजूला आहे. तिथल्या मुलांचं टोळकं इतकंच नाही तर काही वरिष्ठ मंडळीही मला हसत होती.' या सगळ्याकडे हर्षिनी यांनी दुर्लक्ष केलं. त्यांना 'मुली या पदासाठी अर्ज करू शकत नाहीत,' असं सांगण्यात आलं तेव्हा त्यांनी शांतपणे उत्तर दिलं, 'या कोर्ससाठी मुली अर्ज करू शकत नाहीत असं असेल तर ते तुम्ही तुमच्या जाहिरातीत स्पष्ट केलेलं नाही. मग आम्ही अर्ज का करू नये?' या त्यांच्या उत्तराने खिल्ली उडवणाऱ्यांची तोंडं बंद झाली आणि आता आपण याच क्षेत्रात यायचं, असं त्यांच्या मनाने ठाम ठरवलं. त्यांनी कोणालाही न जुमानता कोर्ससाठी अर्ज केला. इतकंच नव्हे तर स्वतःबरोबर आणखी एका मैत्रिणीचाही फॉर्म भरला.

त्यांचा एमबीएचा प्रॉजेक्ट सुरू होता. या प्रॉजेक्टच्या कामानिमित्त त्यांना उशीर होणार होता. त्या दिवशी घरी उशिरा येते, म्हणून फोन केला तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना त्या पास झाल्याचं पत्र आलं असल्याचं सांगितलं. त्या म्हणतात, 'त्या वेळीही मला शॉक बसला. मी माझ्या मैत्रिणीला फोन करून तुला पत्र आलं का, असं विचारलं. पण ती नाही म्हणाली, तेव्हा आणखीच धक्का बसला. आपण पास झालो आहोत यावर विश्वासच बसत नव्हता.'

हर्षिनी यांचं स्वप्न शेवटच्या टप्प्यात आलं होतं. त्यांना मुलाखतीसाठी बोलवण्यात आलं होतं. या पोस्टसाठी पहिल्यांदाच एका



मुलीने अर्ज केला असल्याने त्यांच्यासाठीही या सगळ्या गोष्टी पहिल्यांदाच घडत होत्या. मेडिकल इंटरव्ह्यूच्या पॅनेलमध्ये नागपूरमधले कितीतरी नामांकित डॉक्टर होते, पण अजूनपर्यंत मुलीसाठी शारीरिक पात्रता ठरवणारे कोणतेही निकष लावण्यात आले नव्हते. त्या मुलाखतीसाठी गेल्या तेव्हा त्या एक मुलगी म्हणून गेल्या नाहीत. तर सूट-बूट आणि हातात फाइल घेऊन गेल्या. तेव्हा त्यांना केवळ पाहण्यासाठी संपूर्ण कॉलेज जमलं होतं. कारण त्या संस्थेच्या इतिहासात ही गोष्ट पहिल्यांदाच घडत होती.

'हा कोर्स खूप अवघड आहे, तुला जमेल का, खूप कठीण टास्क असतात. कडक शिस्तीचं पालन करावं लागेल. इथेच राहावं लागेल. तू एकटीच मुलगी आहेस. अर्धवट सोडून देशील. आग विझवायला खूप वेळ लागतो. अगदी दोन-तीन महिनेही. हे सगळं तुला झेपेल का?...' असे प्रश्न त्यांना मुलाखतीत विचारण्यात आले. खरं तर हर्षिनी यांच्यात अत्मविश्वास आहे का, हे ते तपासत होते, पण त्यामागे कुठेतरी केवळ एक मुलगी म्हणून त्यांना डावलण्याचा किंवा हिणवण्याचा प्रयत्न केला जात होता. ही गोष्ट चीड आणणारीच. पण तरीही स्वतःच्या रागावर संयम ठेवून त्या शांतपणे आणि ठामपणे उत्तरल्या, 'मी का करू शकणार नाही? मला स्वतःविषयी पूर्ण विश्वास आहे. तुम्ही आधी मला एक संधी तर देऊन पाहा आणि ते मी करू शकले नाही तर मग अपात्र ठरवा.' त्यांच्या या उत्तराने मुलाखत घेणारे अधिकारीही निरुत्तर झाले.

रविवारी रात्री अंतिम यादी लागणार होती. त्यांचे वडील यादी पाहायला गेले होते आणि त्यांनी हर्षिनी यांना 'तू सिलेक्ट झाली आहे.' असं फोनवरून सांगितलं. मुलांची मक्तेदारी असलेल्या 'नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज'मध्ये इतिहासच घडत होता. मात्र त्याची हर्षिनी आणि त्यांच्या कुटुंबीयांना पुसटशी कल्पनाच नव्हती. त्यामुळे ॲडमिशन मिळाल्याचं विशेष अप्रूपच वाटत नव्हतं. मात्र या कॉलेजमध्ये एका मुलीला ॲडमिशन मिळाली आहे, ही बातमी वाऱ्यासारखी नागपुरात पसरली. अवघ्या दहा मिनिटांत वर्तमानपत्रांतून मुलाखतीसाठी फोन आला. एखाद्या प्रेसमधून मुलाखतीसाठी फोन आल्यावर त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना या विषयाचं महत्त्व कळलं. 'माझ्या आई-बाबांना अतिशय आनंद झाला. कारण ही गोष्ट आमच्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबाला अनपेक्षितच होती. खरं तर सुखद धक्काच होता. त्यांना माझं खूप कौतुक वाटलं. हा क्षण आमच्यासाठी आनंददायीच होता. पण तरीही या क्षेत्राविषयी काहीच कल्पना नव्हती, की यात कोणत्या प्रकारच्या ॲक्टिव्हिटीज असतील, किती वर्षांचा कोर्स आहे, पुढे जॉब आहे की नाही वगैरे. त्यामुळे घरच्यांनी परवानगी द्यायला थोडा वेळ घेतला. काही वरिष्ठांकडून माहिती घेतली. घरच्यांनीही मला काही अटी घातल्या. पण मला कोणत्याही परिस्थितीत हा कोर्स करायचा होता. त्यानंतर मी एमबीएचं कॉलेज सोडलं आणि खऱ्या अर्थाने माझ्या ॲडमिशनवर शिक्कामोर्तब झालं.'

हर्षिनी यांना ॲडमिशन मिळालं खरं, पण एक प्रश्न निरुत्तरितच होता. तो म्हणजे त्यांच्या राहण्याचा. कारण ते कॉलेज आणि हॉस्टेल होतं. त्यामुळे सगळी मुलं तिथेच राहात होती. त्या तिथेही राहायला तयार होत्या, पण त्या सगळ्या मुलांमध्ये हर्षिनी एकट्या कशा राहणार? त्यामुळे हर्षिनी यांना कॉलेजला घरून येण्याची परवानगीही मिळाली.

ही खरं तर २००१-२००३ सालातली गोष्ट. पण आजही ही गोष्ट सांगताना हर्षिनी यांचा ऊर अभिमानाने भरून येतो. त्यांच्या डोळ्यात त्यांच्या कर्तृत्वाची चमक दिसते. त्यांच्या दोन शिफ्ट्स होत्या. सकाळी आणि दुपारची. मध्ये जेवणासाठी हर्षिनी घरी यायच्या, पुन्हा दुपारच्या शिफ्टला जायच्या. या सगळ्यात त्यांनी घरची जबाबदारीही कधी नाकारली नाही. या मिळालेल्या वेळेतही त्या कधी बसल्या नाहीत. उलट शक्य होईल तितकी आईला मदत करत असत.त्या कोर्सच्या पहिल्याच दिवशी युनिफॉर्म घालून कॉलेजला गेल्या, तो प्रसंग आजही त्यांच्या डोळ्यासमोर तरळतो. पहिल्या दिवसाची आठवण त्या सांगतात, 'मला युनिफॉर्म मिळाला होता. तो घालून बाईकवरून कॉलेजला आले. तेव्हा तिकडे एक वरिष्ठ उभे होते. त्यांच्या बाजूला मी बाईक पार्क केली. त्यांना म्हटलं की, मी ॲडमिशन घ्यायला आले तेव्हा तुम्ही मला हसत होता, तेव्हा त्यांना खूप लाजिरवाणं वाटलं. त्या दिवशी त्यांनी माझं स्वागत केलं. हा प्रसंग आजही माझ्या स्मरणात पक्का आहे. कारण मला तेव्हा हर्षिनी म्हणून नव्हे तर समस्त मुलींची प्रतिनिधी म्हणूनच प्रथम ओळख होत होती'.

'अर्थात, हे करिअरच वेगळं होतं. फोर्स पाइप उचलायला लागायचे, लॅडर खांद्यावर उचलून न्यायला लागायचं. ही सगळी टास्क मुलांसाठी कठीण होती, तसंच ती मुलींसाठीही अवघडच होती. 'या क्षेत्रात प्रवेश घेऊन मी समस्त मुलींचं प्रतिनिधित्व करत होते. त्यामुळे माझ्यावर फार मोठी जबाबदारी होती. माझी एकही चूक सगळ्या स्त्री जातीला गालबोट लावणारी ठरली असती. मुली कायमच उशिरा येतात किंवा त्यांना नेहमीच काही ना काही समस्या असतात, आणि म्हणून त्या अशा क्षेत्रात येऊ शकत नाही, असा ठपका मला कधीच लागू द्यायचा नव्हता. ही गोष्ट मी सहनच करू शकत नव्हते. साडेतीन वर्षांच्या या कोर्समध्ये मी कधीच गैरहजर राहिले नाही किंवा कॉलेजमध्ये उशिरा पोहोचले नाही. कठीण अभ्यास होता. फील्डवर्क खूप होतं. शेवटचे सहा महिने प्रॅक्टिकल वर्क होतं. तीन महिने कोलकाता येथील बेहला फायर स्टेशन आणि तीन महिने दिल्लीच्या लक्ष्मीनगर फायर स्टेशनला प्रशिक्षण घेत होते. तीन महिने ड्युटी होती. त्यात आम्ही फायर कॉल्स अटेंड केले. दिल्लीला फायर ऑफिसर म्हणूनही काम केलं. हे सगळं करताना मला तारेवरची कसरत करावी लागत होती. खरोखरच या कोर्समध्ये खूप कठीण कठीण टास्क पूर्ण करायला लागायचं. पण कधीच कोणत्या टास्कला 'नाही' म्हटलं नाही. मला ज्या गोष्टी कठीण वाटतील त्या चांगल्या येण्यासाठी मी सगळ्यांच्या आधी दहा मिनिटं लवकर जाऊन प्रॅक्टिस करायचे. कारण मी नाही म्हटलं तर कोणतीही मुलगी हे करू शकत नाही, असं झालं असतं. ही गोष्ट मी सतत लक्षात ठेवून वागत आले. स्क्वाडमध्ये राइट मार्कर असतो. त्याच्या पायांवर कमांड द्यायचे. माझ्या इन्स्ट्रक्टरला माझ्यावर इतका विश्वास होता की, मुलांऐवजी ते मलाच 'राइट मार्कर' म्हणून कमांड द्यायचे. ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. मला परफॉर्मन्स द्यायचा होता तो मी दिला.'

तीन वर्षांचा कोर्स संपला. आपल्याला हवी ती गोष्ट आपण मिळवली.

आता आपली जबाबदारी संपली असं त्या अजिबात मानत नाहीत. तर त्यांनी ही जबाबदारी कायमच पेलली आहे. त्यांनी अभ्यासाला इतकं वाहून घेतलं होतं की अपघातात जायबंदी असूनही त्या केवळ कॉलेजला हजर झाल्या होत्या. कारण 'नाही' हा शब्द त्यांच्या डिक्शनरीतच नव्हता. वाटेत खूप काही गोष्टी आडव्या येत असतात. पण त्यावर आपण कशी मात करतो हे आपल्या हातात असतं. जेव्हा एखाद्या ध्येयाने आपण पछाडतो तेव्हा ते ध्येय पूर्णत्वाला येईपर्यंत आपण धडपडत असतो. हर्षिनी हे एक त्याचं उत्तम उदाहरण आहे.

'बायका आग लावतात', असं सरसकट विधान केलं जातं, पण आग विझवणारी ही पहिलीच महिला होती. तेच त्यांचं काम होतं. पहिलंवहिलं काम आपल्या सगळ्यांच्याच लक्षात राहतं. हर्षिनी यांचा पहिला अनुभवही तसा वेगळाच होता. पहिलाच प्रसंग आला तो सिलिंडरची आग विझवायचा. हे भयावह काम होतं. त्यातही आग लागलेला सिलिंडर झोपडपट्टी परिसरात म्हणजे दाटीवाटीच्या भागात होता. 'आम्ही तो सिलिंडर मोकळ्या जागेत आणलं आणि त्याला लागलेली आग जेटने न विझवता स्प्रे मारून विझवली. हा पहिला अनुभव होता. त्यामुळे मला खूप बरं वाटलं होतं. लहान लहान आगी आम्ही विझवत होतो. पण ही कामं करण्यात आम्हाला तितकं आव्हान वाटायचं नाही. ऐन दिवाळीत मोठी आग विझवण्याचा अनुभव आला. एका रात्रीत सहा फायर कॉल्स अटेंड केले होते. एका बुटाच्या फॅक्टरीत मोठी आग लागली होती. तिथे ती आग विझवण्यासाठी तब्बल सहा तास लागले होते. पण तिथे खूप प्रॅक्टिकल वर्क शिकता आलं.'

आपल्या कामगिरीने म्हणा किंवा कर्तृत्वाने म्हणा हर्षिनी यांना नोकरीची नामी संधी चालून आली. हा कोर्स संपता संपताच कॅम्पस इंटरव्ह्यूमधून हर्षिनी यांचं ओएनजीसी (मेहसाणा, गुजरात)मध्ये सिलेक्शन झालं. या ठिकाणी त्यांना वेगळा अनुभव आला. म्हणजे त्यांच्या इन्स्ट्रक्टरनेत्यांना एक मुलगी म्हणून वेगळी ट्रीटमेंट कधीच दिली नाही. इतर सहकाऱ्यांप्रमाणेच समान वागणूक मिळाली. त्यांना त्या गोष्टीचा अभिमान आहे. त्या म्हणतात, 'माझे इन्चार्ज जी. डी. सैनिक यांनी मला खूपच प्रोत्साहन दिलं. तू थांब. हे काम तू करू नको,



असं कधीच सांगितलं नाही. त्यांनी स्वतः रिस्क घेतली. खंबीरपणे पाठिंबा दिला. चार वर्षं मी तिथे होते. चार वर्षांत चार ठिकाणी ऑइल रेस्क्यूमध्ये जिथे अन्‌कंट्रोल काम असतं तिथे काम करण्याची मला संधी मिळाली. तिथे भरपूर फायर कॉल्स अटेंड केले. नागरिकांसाठीही काम करायला मिळालं. त्यामुळे मी खूप समाधानी आहे. इथे मी ऑन श्योअर आणि ऑफ श्योअर अशा दोन्ही ठिकाणी काम केलं आहे. ऑफ श्योअरमध्येही मुलींना पाठवलं जात नाही. कारण ही ड्युटी समुद्रात असते. तिथे चौदा दिवसांची चोवीस तास ड्युटी असते. पण माझं काम आणि माझा अनुभव पाहता माझ्या वरिष्ठांनी मला पाठवण्याचा निर्णय घेतला. इतर सहाकाऱ्यांप्रमाणे मलाही जाऊ दिलं. त्यासाठी त्यांनी एक स्पेशल पोस्ट तयार केली. जेणेकरून मला ऑफ श्योअरलाही जाता येईल. असा विचार करणारे लोक मला भेटले, त्यामुळे मी खूप आनंदी आहे. आजही मी ही सगळी कामं करते.'

फायर ऑफिसर या पदावर असूनही त्यांना कित्येकदा तुम्ही फिल्डवर काम केलं आहे का, असं विचारलं जातं. या प्रश्नाने त्या अस्वस्थ होतात. खरं असं विचारणाऱ्या लोकांची त्यांना चीड येते. पण



त्या म्हणतात, 'असा विचार करणारी मंडळी आपल्या आजूबाजूला कित्येक असतात. तुम्ही प्रत्येकाचं तोंड बंद करू शकत नाही. प्रत्येकाचा विचार करत गेलं तर जगणं नकोसं होईल. आपण आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करायचं. पण या सगळ्या गोष्टी नगण्य वाटतात.'

वरकरणी अतिशय साध्या पण स्पष्टवक्त्या, कडक शिस्तीच्या, रफ आणि टफ असणाऱ्या हर्षिनी तितक्याच फेस्टिव्हही आहेत. त्यांना संगीताचीही तितकीच आवड आहे. इतकंच नाही तर त्यांना गिटार आणि ड्रमही वाजवायला आवडतो. फावल्या वेळेत किंवा वेळ मिळेल तेव्हा गिटारवर त्या आपली आवडती गाणी वाजवतात. कोर्स चालू असतानाच त्यांनी शास्त्रीय संगीताचे आणि गिटारचे धडे घेतले. 'मी संध्याकाळी गाणं शिकायचे. कधी फायर कॉलला गेले तर त्यांना फोन करून वेळ ॲडजस्ट करून घ्यायचे. शनिवारी येते म्हणून सांगायचे, पण जायचेच.' आपल्याला आवड असेल तर सवड काढावीच लागेल. तुम्हाला काही शिकायचं असेल तर तुम्हालाच वेळ काढावा लागणार. त्यासाठी कारणं देऊन कसं चालेल? असं त्यांचं स्पष्ट मत आहे.

हल्ली प्रत्येक क्षेत्रात मुलींचं प्रमाण वाढलं आहे. कित्येक तास मुलींना कामानिमित्त बाहेर पडावं लागतं. याविषयी त्यांना आनंदच आहे. पण त्यांना ज्या समस्यांना तोंड द्यावं लागतं. त्याबाबत त्या म्हणतात, 'मी तरीही सेफ झोनमध्ये काम करते. पण मुलींना खूप समस्यांना तोंड द्यावं लागतं. आपण सांगू शकत नाही की कधी, कोणती, कशी समस्या येईल, पण वेळप्रसंगी मुलींनी न घाबरता धैर्याने तोंड दिलं पाहिजे. कारण आपण जेव्हा घाबरतो तेव्हा त्याच स्वरूपाच्या लहरी आपल्याला वेढतात. म्हणूनच कोणत्याही समस्येला तोंड देताना नेहमी सकारात्मक पद्धतीने तोंड द्यावं. मुलींना एक सल्ला द्यावासा वाटतो, तुम्हाला जे वाटतं ते करा. माझी ही पॅशन होती, मला त्यात रस होता, त्या युनिफॉर्मची लालसा होती, म्हणून मी हे केलं. ज्याची आवड असते तेच काम आपण एन्जॉय करू शकतो. प्रत्येक वेळी मी स्वतःला गिनिपिग समजत होते. पण माझ्या कामाने मी वरिष्ठांच्या मनात एक विश्वास निर्माण केला, की मी करेन म्हणजे प्रत्येक मुलगी ते करील. कारण मी केलं नाही तर कोणत्याच मुलीला ही संधी मिळाली नसती. माझ्यानंतर परत विशेष कोणी या क्षेत्रात आलं नाही. याची खंत वाटते.' मात्र नुकतंच नाशिक येथील महावितरण कंपनीने २ हजार वायर वुमनची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा आनंद त्यांनाही आहे.

हर्षिनीला ऑफ श्योअरवर (समुद्रात तेलाची विहीर खोदणे वगैरे कामासाठी) सगळीकडे जावं लागतं. त्या म्हणतात, 'मला हे एक्स्पोजर हवं होतं, त्यासाठी काहीही करण्याची माझी तयारी होती. आपण आपलं काम करत राहायचं. म्हणजे आपल्याला हवं ते आपण मिळवतोच.'

हर्षिनी यांच्याशी बोलून आपण बाहेर पडतो, तेव्हा त्या आवर्जून आपल्याला गेटपर्यंत सोडायला येतात आणि पुन्हा भेटण्याचं आश्वासन घेऊन माघारी फिरतात. आपल्याही चेहऱ्यावर समाधानाची रेषा असते. कारण आपण एका खऱ्याखुऱ्या आगीशी खेळणाऱ्या महिलेला भेटलेलो असतो.

aditi.paradkar@prahaar.co.in